# SUCCESS KEY TEST SERIES

IX (Marathi)

**(Unit Test-1 Marathi ( Semi )2,3)**

मराठी-

| | |
|---|---|
| DATE: 10-09-19 | |
| TIME: 1 Hour 30 Min | |
| MARKS: 40 | |
| SEAT NO: | |

**कृती १ खालील कृती करा - गद्य** ८

१) **आकलन कृती** 2

१.

मातीकाम चालू होते.
- या ठिकाणी → [ ]
- यांच्यांकडे → [ ]

2. **पुढील शब्दांना प्रमाण भाषेतील शब्द सांगा.**

i. कठीया

ii. सी

डोमग्रामी गोसावीयांचा ठायी उदयाचे मातीकाम होत होते: ते सी बाजत होते: तेणे भक्तीजनासी व्यापार होववे ना: आन भट व्यापार् करू लागले: नथोबाए म्हणीतले: “नागदेया: तू कैसा काही हिंवसी ना?” तवं भटी म्हणीतले: आम्ही वैरागी: काइसीया हीवु:” यावरी सर्वज्ञ म्हणीतले: “वानरेया: पोरा जीवासी वैराग्य मिरवु आवडे: हाही एकू विकारूची की गा:” यावरि भटी म्हणीतले: “ जी जी: निर्वीकार तो कवण:” सर्वज्ञे म्हणीतले:” “वानरेया: पोर जीव वीकारावेगळा केव्हेळाली जालाचि नाही: मा तु काइ वेगळा असिसि:” “हो कां जी:” यावरि गोसावी कीर्ती कठीयाचा दृष्टान्त नीरोपीला: “कव्हणी ऐकू कठीया असे: तो भोगस्थानाची सुश्रुषा करी: झाडी: सडा संमार्जन करी: ते देखैनि गावीचे म्हणति: ‘ कठीये हो नीके करीत असा: बरवे करीत असा:’ ते आइकोनि दिसवाडीचा दिसवडी हात हात चढवी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासी किर्तिचेची फळ झाले:”

2) **आकलन कृती** 2

साफसफाई करणा-या पुजाऱ्यास
- हे मिळाले → [ ]
- हे मिळाले नाही → [ ]

3) **१. अचूक शब्द ओळखा.** 2

i. लीळाचरित्र , लिळाचरित्र , लिळाचरित्र

ii. परिश्रमपूर्वक , परीश्रमपूर्वक , परिश्रमपुर्वक

**2. विभक्ती प्रत्यय व विभक्ती ओळखा.**

i. शाळेत - [ ] → [ ]

ii. फुलांनी - [ ] → [ ]

४) **स्वमत :-** 2

पाठातील दृष्टांन्त वेगळ्या उदाहरणद्वारे स्पष्ट करा.

**कृती २ खालील कृती करा - पद्य** ८

१) **कृती करा.** 2

i. संत जनाबाईनी कशाची जवाजुडी केली ? - [ ]

ii. विठ्ठलाच्या पायात काय घातले ?- [ ]

iii. संत जनाबाई यांनी कोणत्या शब्दांचा मारा केला? - [ ]

iv. सोहं शब्दांच्या माऱ्याने विठ्ठलावर झालेला परिणाम - [ ]

धरिला पंढरीचा चोर ।

गळां बांधोनियां दोर ।।1।।

हृदय बंदिखाना केला।
आंत विठ्ठल कोंडिला ।।2।।

शब्दें केली जवाजुडी।
विठ्ठल पायीं घातली बेडी।।3।।

सोहं शब्दाचा मारा केला ।
विठ्ठल काकुलती आला ।।4।।

जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडीं मी तुला ।।5।।

२) **जोडया लावा.** 2

| ' अ ' | ' ब ' |
|---|---|
| 1) विठ्ठलाला धरले | अ) भक्तीच्या दोराने |
| 2) विठ्ठल काकुलतीला आला | ब) 'तू म्हणजे मीच' या शब्दाने |

३) **संदर्भ स्पष्टीकरण :-** 3

'जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडी मी तुला ।।'
या ओळीतून व्यक्त झालेला कवयित्रीचा भाव स्पष्ट करा.

४) **स्वमत :-** 3

संत जनाबाई यांच्या विठ्ठलाविषयीच्या भावना व भक्तीचे दृढ संबध स्पष्ट करा.

**कृती ३अ) प्रस्तुत वरील कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा** **४**

१ कवी / कवयित्री 1
२ प्रस्तावना 1
३ कवितेचा विषय 1
४ कवितेतील आवडलेली ओळ 1
५ मध्यवर्ती कल्पना 2
६ कवितेतून मिळणारा संदेश 2
७ कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे 2

**ब ) पुढील ओळींतील अलंकार ओळखून स्पष्टीकरण लिहा** **2**

रतिहून सुंदर मदन मंजिरी |
मदनाचे वरदान तुला ||

**कृती ४ १. पुढील वाक्यातील योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा** **1**

मॅनेजर म्हणाला छे छे तुम्ही आता स्टेजवर जाण्याची गरज नाही

**२ पुढील ओळींतील रस ओळखा** **2**

अलिबागच्या बागेमध्ये हल्ली नाही अल्ली म्हणून त्याची चिल्लि पिल्ली फिरती गल्लोगल्ली

**३ गटात न बसणारा शब्द लिहा** **1**

दगड, सिमेंट , धोंड, खडक, शिळा

**४ खलील शब्धसमूहासाठी एक शब्द लिहा** **1**

चूक झाल्याची जाणीव

**५ काळ ओळखा** **1**

तो भरभर खाली येऊ लागला.

**कृती ५** **जाहिरात लेखन** **६**

खाली दिलेल्या बातमीच्या मधल्यावरून आकर्षक जाहिरात तयार करा.
' पाठ्यपुस्तकेतर पुस्तके सवलतीच्या दरात मिळतील. '

**कृती ६** **वृत्तान्त लेखन** **६**

खालील विषयावर वृत्तांत लेखन करा.

| |
|---|
| आदर्श बालक मंदिर, इस्लामपूर<br>वृक्षारोपण दिंडी समारंभ<br>६ जुलै २०१७.<br>प्रमुख पाहुणे – श्री. मनोहर राणे.<br>(मुख्याध्यापक विवेकानंद हायस्कूल)<br>स्थळ – शाळेचे मैदान - बांबूची बाग<br>वेळ – सकाळी ८ वाजता |